जा.क्र. २५७१८ दि. ०३/११/२०२२
जा.क्र. सकाळ दि. ०३/११/२०२२

### स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी ; दोन आरोपीसह १७ लाख जप्त

# शहरातील चोरीचा दोन दिवसांत उलगडा

**नांदेड, ता. २ (बातमीदार)** : वजिराबादमधील सन्मान प्रेस्टिज कन्स्ट्रक्शन येथे झालेल्या चोरीचा उलगडा अवघ्या दोन दिवसात करण्यात आला असून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोघांना जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून २२ लाखापैकी रोख १७ लाख १५ हजार ४७० रुपये जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत बुधवारी (ता. दोन) दिली.

सन्मान प्रेस्टीज कार्यालयात ता. ३० ऑक्टोंबर रोजी चोरट्यांनी बाथरूमच्या खिडकीतून आत प्रवेश करून २२ लाख १५ हजार ४७० रुपयांची रोकड चोरून नेली होती. याबाबत वजिराबाद ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिस अधीक्षक कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी वेगवेगळ्या ठिकाणी पथके पाठवून शोध सुरू केला होता. दरम्यान, घटनास्थळ, सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाईलच्या माध्यमातून माहिती घेतली असता चोरटे मुदखेडला असल्याचे कळाले. त्यावरून पथकाने मुदखेड रेल्वेस्थानक परिसरातून शिवदास पुरभाजी सोनटक्के (वय २१, रा. बागमार गल्ली, मुदखेड) आणि अंकुश पांडुरंग मोगले (वय २०, रा. धनगर गल्ली, मुदखेड) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांनी चोरी केल्याचे कबूल केल्यानंतर सोनटक्के याच्या घरातून १३ लाख ४१ हजार चारशे तर मोगलेच्या घरातून चार लाख असे एकूण १७ लाख ४१ हजार ४७० रुपये जप्त करण्यात आले. दोन्ही आरोपींना तपासकामी वजिराबाद पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरील कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक पांडुरंग माने, फौजदार दत्तात्रय काळे, सचिन सोनवणे, आशिष बोराटे, जसवंतसिंग शाहू, सहायक फौजदार संजय केंद्रे, जमादार गुंडेराव कारले, गंगाधर कदम, शंकर म्हैसनवाड, सखाराम नवघरे, अफजल पठाण, विठ्ठल शेळके, देवीदास चव्हाण, तानाजी येळगे, गणेश धुमाळ, कलीम, हेमंत बिचकेवार, महिला पोलिस पंचफुला फुलारी यांनी केली. त्याचबरोबर सायबल सेलचे जमादार दीपक ओढणे व राजू सीटीकर यांनी सहकार्य केले.



**नांदेड : सन्मान प्रेस्टिज येथील चोरीचा उलगडा झाल्यानंतर त्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी बुधवारी दिली. यावेळी अतिरिक्त पोलिस अधीक्षक नीलेश मोरे, विजय कबाडे, पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर उपस्थित होते.**